अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ९० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## ठाकरे गट आणि मनसेत काही जागांवरून मतभेद?

**मुंबई :** मुंबईत ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची घोषणा झाली असली तरी अद्याप ठाकरे गट आणि मनसेतील जागावाटपाचा फॉर्म्युला नेमका कसा असेल? हे जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे जागावाटपावरून ठाकरे गट आणि मनसेत मतभेद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान, यावर आता मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी सविस्तर भाष्य केले आहे. 'काही जागांमध्ये आदलाबदल करण्याबाबत चर्चा सुरू आहे. यावर अंतिम निर्णय झाल्यानंतर आम्ही जागा वाटपाची घोषणा करू', असे त्यांनी सांगितले.

शिवडी, विक्रोळी, माहिम, भांडूप या ठिकाणी ज्या जागा मिळत आहेत त्यावर पक्ष समाधानी नसल्याची चर्चा आहे, असा प्रश्न पत्रकारांनी बाळा नांदगावकर यांना विचारला. यावर बोलताना नांदगावकर म्हणाले की, ''युतीच्या चर्चांमध्ये काही जागा द्याव्या लागतात आणि काही जागा घ्याव्या लागतात. देवाण-घेवाण होत असते. आम्ही आमच्या अनुभवाने युतीची वाटाघाटी करत आहोत. त्याप्रमाणे जेवढ्या जागा आमच्या पदरात पाडून घेता येतील तेवढा प्रयत्न आम्ही करत आहोत'', असे बाळा नांदगावकर म्हणाले.

# देशमुखशाही आमदारांच्या बंडावर भाजप थंड

# पालकमंत्र्याचं विमान लँड, बंद दाराआड मनधरणी

### मंत्री जयकुमार गोरे आले माध्यमांसमोर

### भाजपमधील खळबळीचा नवा अंक 'क्लोज'

### 'ओपन चॅलेंज'ची दखल घेत नाराजी नाट्य दूर करण्यासाठी वेगवान घडामोडी

### स्थानिक आमदारांच्या निर्णयात कोणतीही ढवळाढवळ न करण्याचे आश्वासन

सोलापूर/प्रतिनिधी

**येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भाजपमधील निष्ठावंताना उमेदवारी टाळण्याच्या 'हॉट' मुद्यावर आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांनी काल शुक्रवार (ता.२६) बंडाचं निशान फकडावत पालकमंत्री जयकुमार गोरेंवर निशाणा साधला होता. इतकेच काय तर निष्ठावंताना अन्य पक्षातून निवडून आणू, प्रसंगी भाजपचा राजीनामा देऊ असं 'ओपन' चॅलेंज दिलं होतं. त्यानं खळबळ माजली होती. पालकमंत्री गोरे हे शनिवारी (ता.२७) विमानानं तातडीनं सोलापुरात पोचले. आमदार विजयकुमार देशमुख यांचा रुसवा किंबहुना बंड त्यांनी मोडित काढलं. बंद दाराआड चर्चा करुन त्यांची मनधरणी केली.**

विशेषत्वे,'ओपन चॅलेंज'ची दखल घेत नाराजी नाट्य दूर करण्यासाठी वेगवान घडामोडी मुंबईपर्यंत घडल्या.मंत्री गोरेंना माध्यमांसमोर येऊन स्पष्टीकरण द्यावं लागलं. त्याशिवाय आमदार विजयकुमार देशमुखांनी कालचे शब्द माघारी घेत असल्याचं स्पष्ट केलं. त्यातून भाजपमधील खळबळीचा नवा अंक सध्या तरी 'क्लोज' झाला.

भाजपच्या स्थानिक आमदारांना डावलून पालकमंत्र्यांनी इतर पक्षातील माजी नगरसेवकांना तसेच इच्छुकांना भाजप प्रवेश दिल्याने भाजपचे जेष्ठ आमदार विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख दुखावले गेले होते. इच्छुकांच्या घाऊक इनकमिंगमध्ये आपला कार्यकर्ता मागे पडत असल्याचे त्यांना दिसल्यानंतर शेवटी मालकांनी पक्षश्रेष्ठी तसेच प्रसारमाध्यमांसमोर आपली खदखद व्यक्त केली. त्याला दुजोरा म्हणून बापूंनी मालकांच्या घरी भेट घेऊन मालकांच्या तोंडच्या शब्दाला सहमती दर्शवत कार्यकर्त्यांसाठी वाटेल ते करण्याचे जाहीर केल्याने भाजप पक्षश्रेष्ठींमध्ये खळबळ माजली होती.पालकमंत्र्यांना तातडीने मुंबईला येण्याचे फर्मान धाडण्यात आले. त्यावर पालकमंत्र्यांनी थेट विमानातून मुंबई गाठली. त्याशिवाय इतर पदाधिकारी यांनी देखील मुंबई दौरा केला. प्रदेशाध्यक्षांनी सूचना केल्या. त्या सूचना शिरसंवाद मानून पालकमंत्र्यांनी पुन्हा सोलापूर गाठले. पक्षावर तसेच घाऊक इनकमिंग वर नाराज असलेल्या देशमुखांची नाराजी दूर केली.

#### विजयमालक म्हणाले,

तिकीट वाटप हा विषय नव्हता.प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा निरोप होता. मात्र आईच्या कारणामुळं मी हालू शकत नव्हतो. मी गेले नव्हतो. यादी मात्र पालकमंत्री यांच्याकडे पाठवली होती. दिलेल्या यादीवर चर्चा होईल. मी ४० वर्षे पक्षाचं काम करतो. कार्यकर्ते पक्षासोबत आहेत, त्यांच्यासोबत मी राहणं हे माझं काम आहे.शेवटी आम्ही आणि पक्ष मोठा झाला तो कार्यकर्त्यांच्या जीवावर. जे काही बोललो, माझ्या गैरसमजुतीनं झालं. कालचे शब्द आपण माघारी घेत आहोत.

#### पालकमंत्री गोरे म्हणाले,

सोलापूर शहरात भाजप मजबूत आहे. विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांनी सोलापुरात भाजपचा झेंडा कायम ठेवला आहे. त्यांच्यामुळे सोलापुरामध्ये पक्ष आणि कार्यकर्ता मजबूत ताकदीवर आहे. पक्षातील कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या वाढत आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारसंघ निहाय उमेदवार निवडीचे अधिकार स्थानिक आमदारांना दिलेले आहेत.



#### एकनिष्ठ कार्यकर्त्यालाच उमेदवारी पण...

एकनिष्ठ कार्यकर्त्यालाच उमेदवारी मिळेल यात शंका नाही. मात्र काही ठिकाणी पक्ष वाढवण्यासाठी इतर उमेदवारांना देखील उमेदवारी दिली गेली पाहिजे असे माझे मत आहे. मात्र त्यावर मार्ग निघेल त्यासाठी योग्य रणनीती ठरवली जातील. असे देखील गोरे यांनी सांगितले.

#### मजबूत जागा आम्ही सोडणार नाही

महायुती संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, महायुतीसाठी भाजप नेहमी तयार आहे. तसा प्रस्ताव एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आलेला आहे. मजबूत जागेवर दावा केल्यास ती जागा सोडता येणार नाही. मात्र युती करण्यासाठी आम्ही तयार आहोत. अजित पवार यांचा राष्ट्रवादीसोबत युती करण्याचा प्रश्न नाही. कारण त्यांचा तसा प्रस्तावच आलेला नाही. शिष्टाई माझ्या अंगात आहे स्वच्छ निष्कलंक असे राजकारण माझे आहे. त्यामुळे चांगल्या गोष्टी झाल्यास त्या दुसऱ्यांच्या नावे पडतील. मात्र वाईट गोष्टी झाल्यास माझेच नाव पुढे येईल असे देखील ते म्हणाले.

## भाजप-राष्ट्रवादीत उमेदवारांची खेचाखेची

पिंपरी/प्रतिनिधी

महापालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवलेल्या ३६ जागा आता भाजपने लक्ष्य केल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि इतर पक्षांतील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये खेचण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रवादीचे पॅनेल फोडण्याचाही प्रयत्न आहे, तर मागीलवेळी भाजप ज्या ठिकाणी दुसऱ्या स्थानावर होती, तेथील उमेदवार आपल्याकडे ओढण्याची व्यूहरचना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादीचा गड उद्ध्वस्त करण्यासाठी २०१७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मिशन लोटस' राबविले. भाजपची सत्ता यावी, यासाठी तत्कालीन एकत्रित राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोहरे फोडले. निवडणुकीपूर्वी भोसरीतून एकाच वेळी १८ जणांना प्रवेश दिला होता. चिंचवडमधील १२ नगरसेवक भाजपमध्ये आले होते. तत्कालीन आमदार लक्ष्मण जगताप आणि महेश लांडगे यांनी प्रभाग रचनेपासून उमेदवारीपर्यंत राष्ट्रवादीची जिरवण्याची व्यूहरचना केली होती. त्यामुळे राष्ट्रवादीची सत्ता जाऊन भाजपची सत्ता आली. भाजपला ७७ जागांचे यश मिळाले. पुढे पाच अपक्षांची साथ मिळाली. राष्ट्रवादीला ३६ जागा मिळाल्या.

ज्या ठिकाणी राष्ट्रवादीच्या जागा आल्या होत्या, त्या ठिकाणी सक्षम उमेदवार देण्यासाठी किंवा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील उमेदवार खेचण्यास भाजपने सुरुवात केली आहे.

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीने काँग्रेससोबतची चर्चा थांबवली

मुंबई/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेससोबतच्या आघाडीची चर्चा थांबवली आहे. काँग्रेसकडे २९ जागांची मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीने केली होती. काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीसोबत चर्चा करत असल्याने राष्ट्रवादीची चर्चा पुढे जात नव्हती. आता वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस एकत्र येण्याबाबत आज घोषणा करु शकतात. काँग्रेसने त्यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीला ज्या जागा सोडायच्या होत्या, त्यासंदर्भात नकारात्मकता दर्शवली आहे.

#### उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह रिंगणात उतरणार?

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उद्धव ठाकरेंसोबत चर्चा सुरु आहे. राष्ट्रवादीच्या वतीने माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडून उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा केली जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून शरद पवारांच्या राष्ट्रवादीला १२-१३ जागा मिळू शकतात, अशी प्राथमिक माहिती समोर येताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने काँग्रेस सोबतची चर्चा थांबवली असल्याची पक्षाचे युवक राष्ट्रीय अध्यक्ष फहाद अहमद यांनी माहिती दिली.

#### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



निवडून आल्यावर दाखवतो एकेकांना !

कल्याण
477-82-390

## महाविकास आघाडीच्या बैठकीत वादवादी

### काँग्रेस उद्ध्वस्त करण्याचे दिले ओपन चॅलेंज

सोलापूर/प्रतिनिधी

येथील महापालिकेची निवडणूक महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र येऊन लढण्याच्या पार्श्वभूमीवर, जागा वाटपासंबंधीची माहिती देण्याबद्दल नेतेमंडळींची पत्रकार परिषद सुरु असतानाच वादावादी सुरु झाली. प्रभाग १५ मधील जागा सोडण्याबाबत निर्णय बदला, अन्यथा येथील काँग्रेस उद्धवस्त करु, असं ओपन चॅलेंज कट्टर शिवसैनिक योगेश सलगर यांनी देत महाविकास आघाडीला थेट इशारा दिला. यातून या बैठकीचा नूरच बदलला. तणावाचे वातावरण निर्माण झाले.

प्रभाग १५ मध्ये काँग्रेस नेते तयारीला लागले आहेत. प्रभाग १५ मध्ये काँग्रेसच्या प्रदेश पातळीवरून काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे शिवसेना कार्यकर्ता योगेश सलगर यांनी भर पत्रकार परिषदेदरम्यान काँग्रेस पक्षाला इशारा दिला आहे. २० वर्षांपासून आम्ही काम करत आहोत, मी निष्ठावंत शिवसैनिक आहे. महापालिकेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे, मला न्याय मिळाला हवा, शिवसेनेकडून उमेदवारीला मिळायलाच हवी,अन्यथा मी शिवसेना स्टाईलने आंदोलन करणार, प्रभाग १५ मधील निवडणुकीत महाविकास आघाडीचा धर्म पाळणार नाही.

काँग्रेस पक्षाला उद्ध्वस्त करणार अशा इशारा शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या योगेश सलगरांनी इशारा दिला आहे.






**सोलापूर : काँग्रेसला धमकी देणारे शिवसेनेचे योगेश सलगर. दुसऱ्या छायाचित्रात शिवसेनेचे नेते महेश धाराशिवकर व अजय दासरी यांच्यात खडाजंगी झाली.**

#### दासरी अन् महिंद्रकरांमध्ये वादावादी

मनसे नेते विनायक महिंद्रकर आणि शिवसेना नेते अजय दासरी यांच्यात मोठी वादावादी झाल्याचं सांगण्यात आलं. महाविकास आघाडीच्या बैठकीत काँग्रेस नेते चेतन नरोटे, शिवसेना नेते अजय दासरि, अस्मिता गायकवाड, माकप नेते नरसय्या आडम, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहर अध्यक्ष महेश गादेकर, मनसे नेते महिंद्रकर, प्रशांत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीनंतर या नेत्यांनी पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीचा फॉर्म्युला जाहीर केला. काँग्रेस ४५, शिवसेना उद्धव ठाकरे ३०, राष्ट्रवादी अजित पवार पक्ष २०, माकप ७ असे ठरले असल्याचे घोषित केले जात होते.यादरम्यान मनसे नेत्यांनी बैठकीत ५ जागांवर दावा केला होता. महाविकास आघाडीतील नेते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला किती जागा देणार आहेत, याबाबत स्पष्टता झालेली नव्हती. बैठकीदरम्यान शिवसेनेचे नेते आणि मनसे नेते यांच्यात वादावादी झाली.

#### वाद टोकाला गेला, वापरली अरेरावीची भाषा

महाविकास आघाडीच्या बैठकीदरम्यान शिवसेनेचे नेते एकमेकांना अरेरावीची भाषा करताना आढळून आले. प्रभाग ८ मध्ये सर्वसाधारण पुरुष जागा ही शिवसेनेने घेतली आहे. एक जागा ओबीसीसाठी राखीव आहे. मनसे नेते विनायक महिंद्र यांनी ओबीसी जागेसाठी मागणी केली. शिवसेना नेते अजय दासरी यांनी दोन्ही जागांवर दावा केल्याने मनसे नेते चिडले. एक जागा आम्हाला ओबीसी सोडा असे मनसेची मागणी होती.